# सेवकांच्या लसीकरणाची सहकारी बँकेची तयारी

**पुणे, दि. २८, (प्रतिनिधी)** : राज्यातील सहकारी बँकिंग क्षेत्रातील सर्व सेवकांच्या करोना प्रतिबंधक लसीकरणाचा खर्च उचलण्याची तयारी राज्य सहकारी बँकेने दर्शवली आहे. या संदभार्तील प्रस्ताव बँकेने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सादर केला आहे. त्यामध्ये सर्व जिल्हा सहकारी बँका, सर्व नागरी सहकारी बँका आणि त्यांच्या जिल्हा असोसिएशन्स व फेडरेशन्सचे संचालक, अधिकारी व सर्व प्रवगार्तील सेवकांचा समावेश आहे. करोना प्रतिबंधक लसीकरण मोहिमेअंतर्गत एक मेपासून १८ वर्षांपुढील व्यक्तींचे लसीकरण सुरू होणार आहे. त्यानुसार राज्य सरकारकडून मोफत लसीकरणाचे धोरण निश्चित केले जाणार आहे. त्या व्यतिरिक्त सहकारी बँकिंग क्षेत्रातील १८ वर्षांवरील सर्व सेवकांच्या लसीकरणाची जबाबदारी तयार असल्याचे राज्य सहकारी बँकेने प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केले आहे. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील सरकारी यंत्रणेची मदत घेण्यासोबतच मोठ्या रुग्णालयांसोबत करार करून प्रत्येक सेवकाला विशेषाधिकार वैद्यकीय सेवा ओळखपत्र देण्यात येईल. पुण्यात एका खासगी रुग्णालयाने प्रत्येक बँकेच्या ठिकाणी सर्व सोयींनी सुसज्ज अशी कार्डियाक रुग्णवाहिका, दोन डॉक्टर व आवश्यक कर्मचाऱ्यांच्या मदतीने दिवसाला सुमारे ३०० सेवकांचे लसीकरण करण्याचा प्रस्ताव दिला आहे. त्याचबरोबर या ओळखपत्राच्या माध्यमातून मोफत वैद्यकीय सल्ला व मार्गदर्शन आणि सर्व वैद्यकीय सेवांवर १० ते २० टक्के सवलतीची योजना सादर केली आहे. या ओळखपत्रासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही. त्यामुळे ज्या बँकांना या सुविधेचा लाभ घ्यायचा आहे, त्यांनी राज्य सहकारी बँकेच्या मुंबई कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन बँकेच्या प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांनी केले आहे.

# पुणे पालिकेचे 'कोविड शववाहिनी ॲप'; स्मशानभूमीतील वेटिंगपासून ते रुग्णवाहिकांच्या डिटेल्स सेंकदात मिळणार!

**पुणे, दि. २८, (प्रतिनिधी)** : राज्यात कोरोनाने हाहाकार माजवला असून दररोज मृतांच्या आकड्यात वाढ पहायला मिळतेय. मृतांचे प्रमाण एवढे वाढले आहे की, अंत्यसंस्कारासाठी जागा आणि मृतदेह नेण्यासाठी ॲम्बुलन्स मिळत नाही आहे. राज्यातील महाशहरांपैकी एक असलेल्या पुण्यात कोरोनाने सरासरी दीडशे जणांचा दररोज मृत्यू होतोय. कोरोना रुग्णांच्या मृत्यूनंतर शववाहिका मिळण्यापासून ते अंत्यविधीसाठी स्मशानभूमी मिळेपर्यंत नागरिकांचे प्रचंड हाल होत असल्याचे विदारक चित्र आहे. ही समस्या दूर करण्यासाठी पुणे महापालिकेने खास 'कोविड शववाहिनी' हे ॲप तयार केले आहे. या ॲपवर शववाहिका उपलब्ध होणार आहेच, पण त्याचबरोबर कोणत्या स्मशानभूमीत लगेच अंत्यसंस्कार होतील याची माहितीही नातेवाईक, रुग्णालय व शववाहिकेच्या चालकाला मिळणार आहे. मृतांची संख्या वाढत असताना हेल्पलाईन उपयोगी ठरत नसल्याने नातेवाईक, रुग्णालयातील कर्मचारी यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. हा मनस्ताप कमी करण्यासाठी महापालिकेने हे ॲप तयार केले आहे.

**स्मशानभूमीतील वेटिंग कमी होण्यास मदत होणार**

शहरात रोज किमान १५० जणांचा कोरोनाने मृत्यू होत आहे. त्याचा ताण निर्माण होत असल्याने हे ॲप तयार केले आहे. या ॲपमुळे नातेवाईकांची शववाहिका व स्मशानभूमी यासाठी धावाधाव बंद झालीय आहे. यामुळे स्मशानभूमीतील वेटिंगही कमी होण्यास मदत होणार आहे. रुग्णाचा मृत्यू झाल्यावर हॉस्पिटलकडून ऑनलाईन पद्धतीने डेथपास काढला जातो. त्यासाठी आवश्यक ती माहिती त्यात भरण्यात येते. ही प्रकिया पूर्ण झाल्यावर सर्व माहिती शववाहिका अँपवर उपलब्ध होते. त्यानुसार पालिकेचे कर्मचारीच मृत रुग्णांच्या नातेवाईकाला फोन करुन माहिती देतात. याशिवाय एसएमएसद्वारे ही त्या नातेवाईकाला शवाहिकेचा नंबर, चालकाचा नंबर स्मशानभूमी, वेळ कळवली जाते.

**पुणे शहरातील सर्वाधित मृत्यू ससून रुग्णालयात**

पुणे शहरातील एकूण मृतांपैकी अडीच हजार बळी एकट्या ससून रुग्णालयात गेले आहेत. अडीच हजारापैकी ६०० जणांचा मृत्यू हा रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच झाल्याची माहिती आहे. ससूनमध्ये क्रिटिकल रुग्णांना उपचारासाठी पाठवलं जात असल्यामुळे ससूनमध्ये मृत्यूचं प्रमाण जास्त आहे. सध्या ४७७ रुग्णांवर ससूनमध्ये उपचार सुरू आहेत. शहरात आतापर्यंत ६ हजार ४९८ जणांचा कोरोनानं बळी घेतला आहे. पुण्यात कोरोनाबाधितांचा आकडा कमी झाला असला तरी मृत्यूची संख्या मात्र आटोक्यात येताना दिसत नाही. पुण्यात काल दिवसभरात २५३८ पॉझिटिव्ह रुग्ण आढळले आहेत. दिवसभरात ४३५१ रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला. पुण्यात कोरोनाबाधीत ७० रुग्णांचा मृत्यू झाला असून यापैकी १६ रूग्ण पुण्याबाहेरील आहेत. तर १३७१ क्रिटिकल रुग्णांवर उपचार सुरू आहेत. पुण्यातील एकूण पॉझिटिव्ह रुग्णसंख्या ४०२६५५ इतकी आहे. एकूण ॲक्टिव्ह रुग्णसंख्या ४७४२० असून आतापर्यंत एकूण ६५५४ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

# पुणे महापालिका सिरमची लस खरेदी करणार; महापौरांची माहिती

**पुणे, दि. २८, (प्रतिनिधी)** : पुण्यात कोरोनाचा कहर वाढत असतानाच, प्रतिबंधासाठी लसीकरणाचा वेग वाढणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर पुण्याचे महापौर मुरलीधर मोहोळ यांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मागील काही दिवसांपासून लशींचा साठा सातत्याने कमी येत आहे. त्यामुळे अनेक लसीकरण केंद्रे बंद ठेवावी लागली. पुण्याचे महापौर मुरलीधर मोहोळ यांनी सिरम इन्स्टिट्यूटचे सीईओ अदर पुनावाला यांच्यासोबत चर्चा करुन कोविशिल्ड लस खरेदी करणार आहेत. ट्विटरच्या माध्यमातून त्यांनी ही माहिती दिली आहे.

कोविशिल्ड लस सिरमकडून खरेदीसाठी प्रयत्नशील, असं मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे. १ मेपासून कोरोना लस खुल्या बाजारात विक्रीस उपलब्ध होणार आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आपण पुणे महापालिकेच्यावतीने थेट लस खरेदी करण्याचा प्रयत्न करत आहोत. सीरमचे सीईओ अदर पुनावाला यांच्याशी संपर्क साधणार असून याबाबतची स्पष्टता लवकरच येईल. सिरमकडून लस उपलब्ध झाल्यास पुणेकरांचे लसीकरण वेगानं पूर्णत्वास जाण्यास मदत होईल, असं महापौरांनी म्हटलं आहे.

दरम्यान, कोरोना प्रतिबंधक लसीकरणात महाराष्ट्राची विक्रमी कामगिरी झाली असून लसीकरणात दीड कोटींचा टप्पा राज्यानं गाठला आहे. आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी माहिती दिली आहे. महाराष्ट्राने आज दीड कोटी लसीकरण पूर्ण केले असून एवढ्या मोठ्यासंख्येने लसीकरण करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य ठरले आहे. काल दिवसभरात ५ लाख ३४ हजार नागरिकांना लस देऊन राज्याने विक्रमी नोंद केली आहे, असं राजेश टोपे यांनी म्हटलं आहे.

# आसाम भूकंपावर पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, सर्वानंद सोनवाल यांच्यात चर्चा

नवी दिल्ली, दि.२८ : प्रदीर्घ जागतिक कोरोना संकटाच्या सावलीत आसाममध्ये भूकंपाच्या घडामोडींवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मुख्यमंत्री सर्वानंद सोनवाल यांच्याशी संपर्क साधला आणि एकंदर स्थितीची माहिती घेतली. ट्विटर द्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आसाममध्ये विविध भागात आलेल्या भूकंपावर मुख्यमंत्री सर्वानंद सोनवाल यांच्याशी बोलणे झाले. केंद्राकडून सर्व प्रकारच्या मतदीचे आश्वासन दिले. आसामच्या नागरिकांच्या सौख्यासाठी प्रार्थना करतो. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील मुख्यमंत्री सर्वानंद सोनवाल यांच्याशी संपर्क साधला आणि घटनाक्रमाचा आढावा घेतला. ट्विटर द्वारे अमित शाह म्हणाले, आसामचे मुख्यमंत्री सर्वानंद सोनवाल यांच्याशी बोलणे झाले. भूकंपामुळे विविध भागातील परिस्थिती जाणून घेत चर्चा केली.

# दुसऱ्या डोससाठी अपॉइंटमेंटची गरज नाही; पुणे महापालिकेची माहिती

**पुणे, दि. २८, (प्रतिनिधी)** : लसीचा दुसरा डोस घ्यायचा असेल, तर ऑनलाइन अपॉइंटमेंट घ्यायची गरज नाही. पहिल्या डोसनंतर निर्धारित कालावधी पूर्ण झाला असल्यास लस उपलब्ध असलेल्या महापालिकेच्या केंद्रांवर थेट लस मिळू शकेल, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

को-विन ॲपवरून पहिल्या डोससाठी अपॉइंटमेंट मिळत आहे. दुसऱ्या डोससाठी अपॉइंटमेंट घेता येत नसल्याची तक्रार अनेक नागरिक करीत आहेत. काहींना दुसऱ्या डोससाठी मिळालेली अपॉइंटमेंट लशीच्या अनुपलब्धतेमुळे आपोआप रद्द होत आहे. त्यामुळे नागरिक हवालदिल झाले असून, आपल्याला दुसरा डोस मिळणार की नाही, अशी चिंता त्यांना वाटत आहे.

पुणे महापालिकेच्या हद्दीत सुमारे साडेसहा लाख नागरिक सध्या दुसऱ्या डोससाठी पात्र आहेत. त्यांना अद्याप दुसरा डोस मिळालेला नाही. सरकारी आदेशानुसार 'कोव्हॅक्सिन' लस सध्या दुसऱ्या डोससाठीच राखून ठेवण्यात आली आहे. 'कोव्हिशील्ड'ही उपलब्ध झाल्यानंतर दुसरा डोस प्राधान्याने दिला जात आहे. काही खासगी रुग्णालये ऑनलाइन अपॉइंटमेंटनुसार, तर काही रुग्णालये सकाळी वितरित केलेल्या टोकननुसार लस देत आहेत. नागरिकांनी लसीकरण केंद्रावर जाण्यापूर्वी दूरध्वनीद्वारे उपलब्धतेबाबत खात्री करून घ्यावी.

महापालिकेच्या अधिकारी-पदाधिकाऱ्यांकडून सोशल मीडियाच्या माध्यमातून दररोज लसीकरण केंद्रांची व तेथे कोणती लस उपलब्ध आहे, याची माहिती दिली जात आहे.

एक मेपासून १८ वर्षांपुढील नागरिकही लशीसाठी पात्र ठरतील. मात्र, पुणे महापालिकेने दुसऱ्या डोसलाच प्राधान्य देण्याचे नियोजन केले आहे. तशी घोषणाही महापौरांनी केलेली आहे. त्यामुळे एक तारखेनंतर गर्दी झाल्यास काय करायचे, ही भीती बाळगून ज्येष्ठ नागरिकांनी लगेचच दुसऱ्या डोससाठी गर्दी करू नये. त्यांना निर्धारित वेळेत व सुरक्षित पद्धतीने लस मिळेल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# दुसऱ्या डोससाठी अपॉइंटमेंटची गरज नाही; पुणे महापालिकेची माहिती

**पुणे, दि. २८, (प्रतिनिधी)** : लसीचा दुसरा डोस घ्यायचा असेल, तर ऑनलाइन अपॉइंटमेंट घ्यायची गरज नाही. पहिल्या डोसनंतर निर्धारित कालावधी पूर्ण झाला असल्यास लस उपलब्ध असलेल्या महापालिकेच्या केंद्रांवर थेट लस मिळू शकेल, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

को-विन ॲपवरून पहिल्या डोससाठी अपॉइंटमेंट मिळत आहे. दुसऱ्या डोससाठी अपॉइंटमेंट घेता येत नसल्याची तक्रार अनेक नागरिक करीत आहेत. काहींना दुसऱ्या डोससाठी मिळालेली अपॉइंटमेंट लशीच्या अनुपलब्धतेमुळे आपोआप रद्द होत आहे. त्यामुळे नागरिक हवालदिल झाले असून, आपल्याला दुसरा डोस मिळणार की नाही, अशी चिंता त्यांना वाटत आहे.

पुणे महापालिकेच्या हद्दीत सुमारे साडेसहा लाख नागरिक सध्या दुसऱ्या डोससाठी पात्र आहेत. त्यांना अद्याप दुसरा डोस मिळालेला नाही. सरकारी आदेशानुसार 'कोव्हॅक्सिन' लस सध्या दुसऱ्या डोससाठीच राखून ठेवण्यात आली आहे. 'कोव्हिशील्ड'ही उपलब्ध झाल्यानंतर दुसरा डोस प्राधान्याने दिला जात आहे. काही खासगी रुग्णालये ऑनलाइन अपॉइंटमेंटनुसार, तर काही रुग्णालये सकाळी वितरित केलेल्या टोकननुसार लस देत आहेत. नागरिकांनी लसीकरण केंद्रावर जाण्यापूर्वी दूरध्वनीद्वारे उपलब्धतेबाबत खात्री करून घ्यावी.

महापालिकेच्या अधिकारी-पदाधिकाऱ्यांकडून सोशल मीडियाच्या माध्यमातून दररोज लसीकरण केंद्रांची व तेथे कोणती लस उपलब्ध आहे, याची माहिती दिली जात आहे.

एक मेपासून १८ वर्षांपुढील नागरिकही लशीसाठी पात्र ठरतील. मात्र, पुणे महापालिकेने दुसऱ्या डोसलाच प्राधान्य देण्याचे नियोजन केले आहे. तशी घोषणाही महापौरांनी केलेली आहे. त्यामुळे एक तारखेनंतर गर्दी झाल्यास काय करायचे, ही भीती बाळगून ज्येष्ठ नागरिकांनी लगेचच दुसऱ्या डोससाठी गर्दी करू नये. त्यांना निर्धारित वेळेत व सुरक्षित पद्धतीने लस मिळेल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# सामाजिक बांधिलकीतून कोव्हिड सेंटर सुरू

**दौंड, दि. २८, (प्रतिनिधी)** : दौंड शहरामध्ये गुजराती भवन येथे जागेत १०० खाटांचे कोव्हिड केअर सेंटर सुरू करण्यात आले आहे. शहरात विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या मंडळींनी सामाजिक भावनेतून हे सेंटर सुरू केले असून, यामध्ये सौम्य लक्षणे असणाऱ्या रुग्णांची सोय करण्यात येत आहे.

सरकारच्या विविध खात्यांची परवानगी घेऊन आणि उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. संग्राम डांगे यांनी पाहणी केल्यानंतर नुकतेच येथील कोव्हिड केअर सेंटर कोरोनारुग्णांसाठी खुले करण्यात आले. या सेंटरमध्ये औषधोपचाराबरोबरच रुग्णांसाठी योग, करमणुकीसाठी कॅरम, वाचनासाठी वर्तमानपत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. शिवजीभाई पोकार यांनी जागा उपलब्ध करून दिली असून, 'रोटरी'चे अध्यक्ष सुशील शहा यांनी १५ खाटा आणि इतर सुविधा दिल्या आहेत.

स्वप्नील शहा यांनी ५० गाद्या व ५० उशा, नीलकमल लुंड यांनी ५० खाटा आणि धरमजी लुंड १० खाटा दिल्या आहेत. रुग्णांच्या चहा-पाण्याची व्यवस्था रोहन जोगळेकर पाहत आहेत. वीज आणि मंडप व्यवस्था रामेश्वर मंत्री, गणेश भोसले यांनी केली आहे. दौंड शहरातील अनेक व्यापाऱ्यांनी रुग्णांच्या जेवणासाठी किराणा माल व भाजीपाला उपलब्ध करून दिला आहे.

# गृहनिर्माण सोसायट्यांनी वहिवाटीचा रस्ता अडवला?

**पुणे, दि. २८, (प्रतिनिधी)** : सेनापती बापट रस्त्यावरील सहारा हॉटेल परिसरातील दोन गृहनिर्माण सोसायट्यांनी वहिवाटीचा रस्ता अडवल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. तसेच हा रस्ता महापालिकेच्या विकास आराखड्यांतर्गत (डीपी) विकसित करण्यात आल्याचा दावाही स्थानिक नागरिकांनी केला असून हा रस्ता तातडीने सुरू करण्यासाठी महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी कार्यालयाला पत्र दिले आहे. तर, संबंधित रस्ता सोसायट्यांचा अंतर्गत रस्ता असल्याचे सोसायटीधारक सांगत आहेत.

सेनापती बापट रस्त्यावरील सहारा हॉटेल परिसरात लक्ष्मी आणि विश्रामबाग या दोन गृहनिर्माण संस्था आहेत. नुकताच हा रस्ता सिमेंट काँक्रिटचा करण्यात आला आहे. या रस्त्यावरून पुढे दुर्गानगर भागाकडे जाण्यासाठी स्थानिक नागरिक या रस्त्याचा वापर करतात. रस्ता सिमेंटचा करण्यात आल्यानंतर दोन्ही सोसायट्यांनी दोन्ही बाजूंनी हा रस्ता अडवला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना लोखंडी जाळ्यांचे सुरक्षाफाटक बसवण्यात आले आहे. या ठिकाणी हा रस्ता सोसायटीच्या मालकीचा असून इतर नागरिकांना हा रस्ता वापरण्यास मनाई असल्याचे फलकही लावण्यात आले आहेत, अशी माहिती स्थानिक नागरिक सचिन माळवदकर यांनी दिली. पालिकेच्या विकास आराखड्यात हा रस्ता प्रस्तावित आहे. त्यानुसार या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात आले आहे.

तसेच पथदिवे, इतर सुविधाही पुरवण्यात आल्या आहेत. हा रस्ता दुर्गानगरकडे किंवा तेथून सेनापती बापट रस्त्याकडे जाण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून वापरण्यात येतो. करोना काळाचा फायदा घेऊन दोन्ही सोसायट्यांनी हा रस्ता बंद केला आहे. पायी चालत जाण्यासही सुरक्षारक्षकांकडून मज्जाव करण्यात येत आहे. सामाजिक कार्यकर्ते नीलेश निकम यांच्या माध्यमातून महापालिका प्रशासनाला वारंवार निवेदन देण्यात आले असले, तरी अद्याप रस्ता खुला झालेला नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांना निवेदन दिले आहे, असेही माळवदकर यांनी सांगितले.

# ॲड. दीप्ती काळेचा ससूनच्या आठव्या मजल्यावरून पडून मृत्यू; मोक्का लागताच...



**पुणे, दि. २८, (प्रतिनिधी)** : एका ज्वेलर्स व्यावसायिकाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दीप्ती काळेच्या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यानुसार (मोक्का) आज कारवाई करण्यात आली. दरम्यान, ॲड. दीप्ती काळे हिला पूर्वीच अटक करण्यात आली होती आणि तिच्यावर ससूनमध्ये उपचार सुरू होते व आज दुपारी चारच्या सुमारास आठव्या मजल्यावरील बाथरूमच्या खिडकीतून पडून तिचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना ती पडली व त्यात तिचा मृत्यू झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीप्ती सरोज काळे (रा . ज्ञाती इक्वोटेरियम, बावधन) आणि निलेश उमेश शेलार या दोघांना विश्रामबाग पोलिसांनी ज्वेलर्सला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या गुन्ह्यात अटक केली होती.

तसेच, तिच्यावर सोमवारी आणखी एक खंडणीचा गुन्हा दाखल झाला होता. आज सकाळीच काळेसह तिच्या टोळीवर मोक्काची कारवाई करण्यात आली होती. काळे हिला अटक केल्यानंतर तिला उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल केले होते.

दीप्ती काळे हिच्यावर ससूनच्या आठव्या मजल्यावर उपचार सुरू होते. आज दुपारी चारच्या सुमारास ती कपडे धुण्यासाठी बाथरूममध्ये गेली होती. त्यावेळी गार्ड बाहेरच थांबला होता. वीस मिनिटे झाले तरी काळे बाहेर येत नसल्यामुळे त्याने अंदाज घेतला. त्यावेळी आतमधून काहीही आवाज येत नव्हता. त्यामुळे इतरांच्या मदतीने गार्डनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्यावेळी खिडकीच्या काचा काढून ठेवल्याचे दिसून आले. तसेच, खाली एक महिला जखमी अवस्थेत पडलेली दिसली. पोलिसांनी जाऊन पाहिल्यानंतर ती काळे असल्याचे आढळून आले. तिचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली आहे.

दरम्यान, काळे ही पोलिसांच्या अटकेत होती. अटकेत असताना तिचा मृत्यू झाल्यामुळे या प्रकरणाची राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी) मार्फत चौकशी केली जाईल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

## Arka Fincap Limited

**(Formerly known as Kirloskar Capital Limited)**

**Regd. Office:** One World Center, 1202B, Tower 2B, Floor 12B, Jupiter Mills Compound, Senapati Bapat Marg Mumbai- 400013, India **Tel:** +91 22 40471000 **CIN:** U65993MH2018PLC308329
**Website:** www.arkafincap.com **E-mail:** arkainfo@arkafincap.com

**EXTRACT OF AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE HALF YEAR ENDED AND YEAR ENDED 31 MARCH 2021**

(₹ in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Half Year Ended | | Year Ended | |
|---|---|---|---|---|---|
| | | 31 March 2021 Audited | 31 March 2020 Unaudited | 31 March 2021 Audited | 31 March 2020 Audited |
| 1 | Total Income from Operations | ₹ 6,229.11 | ₹ 2,930.70 | ₹ 10,188.51 | ₹ 4,842.68 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | ₹ 1,304.29 | ₹ 783.11 | ₹ 2,327.55 | ₹ 1,016.82 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | ₹ 1,304.29 | ₹ 783.11 | ₹ 2,327.55 | ₹ 1,016.82 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | ₹ 982.68 | ₹ 519.86 | ₹ 1,688.34 | ₹ 609.40 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | ₹ 991.30 | ₹ 517.77 | ₹ 1,696.96 | ₹ 607.31 |
| 6 | Paid up Equity Share Capital (Face value of ₹ 10/- each) | | | ₹ 63,996.98 | ₹ 52,650.00 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) | | | 3,338.18 | 279.08 |
| 8 | Earning per share (In ₹ ) (Not Annualised): | | | | |
| | (a) Basic (Not Annualised) | 0.17 | 0.10 | 0.30 | 0.12 |
| | (b) Diluted (Not Annualised) | 0.17 | 0.10 | 0.30 | 0.12 |

a. The above is an extract of detailed format of audited financial results for the half year and year ended 31 March 2021, prepared pursuant to Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 read with SEBI circular dated 5 July 2016. The full format of the Audited financial results are available on the website of the Company at www.arkafincap.com and on the website of the BSE Ltd. at www.bseindia.com.

b. The financial results of the Company have been prepared in accordance the Indian Accounting Standard ("Ind AS") notified under section 133 of the Companies Act, 2013 ("the Act") read with the Companies (Indian Accounting Standards) Rules, 2015 as amended from time to time. The Company has adopted Ind AS from 1 April 2020 with effective transition date of 1 April 2019. This transition has been carried out from the erstwhile Accounting Standards notified under the Act, read with relevant rules issued thereunder and guidelines issued by the Reserve Bank of India ("RBI") and generally accepted accounting principles in India (collectively referred to as "Previous GAAP"). Accordingly, the impact of transition has been recorded in the opening reserve as at 1 April 2019 and the corresponding figures presented in these results have been restated/ reclassified in order to confirm with current period presentation.

c. As required by Paragraph 32 of Ind-AS 101, net profit reconciliation between the figure under the Previous GAAP and Ind AS is as under:

(₹ in Lakhs)

| Particulars | Half Year Ended 31 March 2020 Unaudited | Year Ended 31 March 2020 Audited |
|---|---|---|
| **Net Profit after tax under Previous GAAP** | **931.47** | **1188.18** |
| **Ind AS adjustments resulting in increase/(decrease) in net profit after tax under the Previous GAAP:** | | |
| a. Lease and Security deposit Discounting | (12.48) | (28.15) |
| b. Fair valuation of employee loans | 0.87 | 1.31 |
| c. Fair valuation of Investments | (100.85) | (4.12) |
| d. Fair valuation of Loans | (109.31) | (180.90) |
| e. Fair valuation of employee stock options | (220.78) | (472.05) |
| f. Stamp duty paid on equity shares | 0.00 | 49.95 |
| g. Expected credit Loss provision | (36.03) | 0.00 |
| h. Tax effect on above adjustments | 64.88 | 53.09 |
| **Total Comprehensive income as per Ind AS** | **517.77** | **607.31** |

d. Reconciliation of Equity as at 31 March 2020 as reported under the Previous GAAP and Ind AS is as under:

(₹ in Lakhs)

| Particulars | As at 31 March 2020 Audited |
|---|---|
| **Net Worth/ Total Equity reported under Previous GAAP (A)** | **53,091.90** |
| **Summary of Ind AS adjustments:** | |
| a. Lease and Security deposit Discounting | (29.35) |
| b. Fair valuation of employee loans | (3.21) |
| c. Fair valuation of Investments | (4.12) |
| d. Fair valuation of Loans | (180.90) |
| e. Tax effect on above adjustments | 54.76 |
| **Total Ind AS adjustments (B)** | **(162.82)** |
| **Total Equity under Ind AS (A+B)** | **52929.08** |

e. Financial results for the half year ended 31 March 2020 have been restated as per Ind AS and have not been subjected to limited review or audit. However, the management has exercised necessary due diligence to ensure that the financial results for the half year ended 31 March 2020 provide a true and fair view of the Company's affairs.

f. The above financial results of Arka Fincap Limited ("AFL" or "the Company") for the half year and full year ended 31 March 2021 have been reviewed by the Audit Committee and subsequently approved at the meeting of the Board of Directors held on 28 April 2021.

**For and on behalf of the Board of Directors of**
**Arka Fincap Limited**
**(Formerly known as Kirloskar Capital Limited)**
**Sd/-**
**Vimal Bhandari**
Executive Vice Chairman and CEO
DIN: 00001318

Place: Mumbai
Date: 28 April 2021

**Disclosures in accordance with Regulation 52(4) of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations") for the year ended 31 March 2021**

**(a) Credit Rating**

| Sr. No. | Nature of Instrument | Name of the Instrument | Name of Credit Rating Agency | Amount Rated (₹ in Lakhs) | Current Rating | Date of Rating |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Long term instrument | Bank Lines | CRISIL | 70,000 | CRISIL AA-/Stable | 24/03/2021 |
| 2 | Long term instrument | Non-convertible debentures | CRISIL | 12,500 | CRISIL AA-/Stable | 29/05/2020 |
| 3 | Long term instrument | Non-convertible debentures | CRISIL | 5,000 | CRISIL AA-/Stable | 25/06/2020 |
| 4 | Long term instrument | Non-convertible debentures | CRISIL | 7,000 | CRISIL AA-/Stable | 23/12/2020 |
| 5 | Long term instrument | Non-convertible debentures | INFOMERICS Valuation and Rating Private Limited | 7,000 | IVR AA-/Stable | 23/12/2020 |
| 6 | Short term instrument | Commercial paper | CRISIL | 5,000 | CRISIL A1+ | 23/12/2020 |

There is no change in the Credit Rating in current year except increase in credit rating amount of long-term instruments.

**(b) Asset Cover available:** As per the first proviso to Regulation 52(4) of Listing Regulations, the requirement of disclosing Asset Cover is not applicable to the Company being a Non-Banking Financial Company registered with the Reserve Bank of India.

**(c) Debt-Equity Ratio: 1 : 1**

**(d) Previous due date for the payment of interest / repayment of principal in respect of the Non-Convertible Debentures and whether the same has been paid or not during the half year ended 31 March 2021:**

| Nature of the Instrument | Listed/ Un-Listed | Scrip Code | Previous Due date for Interest Payment | Previous Due date for Principal Payment | Payment Status |
|---|---|---|---|---|---|
| NCD Series I | Listed | 959522 | 28/02/2021 | - | Paid on 26/02/2021 |
| NCD Series II | Listed | 959543 | 28/02/2021 | - | Paid on 26/02/2021 |
| NCD Series III | Listed | 959592 | 31/03/2021 | - | Paid on 31/03/2021 |
| NCD Series IV | Un-Listed | NA | - | - | - |
| NCD Series V | Un-Listed | NA | - | - | - |
| NCD Series VI | Un-Listed | NA | - | - | - |

**(e) Next due date for the payment of interest / principal in respect of Non-Convertible Debentures from 1 April 2021 to 30 September 2021:**

| Nature of the Instrument | Listed/ Un-Listed | Scrip Code | Next Due date for Interest Payment | Next Due date for Principal Payment |
|---|---|---|---|---|
| NCD Series I | Listed | 959522 | 31/05/2021 & 31/08/2021 | - |
| NCD Series II | Listed | 959543 | 31/05/2021 & 31/08/2021 | - |
| NCD Series III | Listed | 959592 | 30/06/2021 & 30/09/2021 | - |
| NCD Series IV | Un-Listed | NA | 30/06/2021 | - |
| NCD Series V | Un-Listed | NA | 31/07/2021 | - |
| NCD Series VI | Un-Listed | NA | - | - |

**(f) Debt Service Coverage Ratio:** Not Applicable
**(g) Interest Service Coverage Ratio:** Not Applicable
**(h) Outstanding redeemable preference shares:** Nil
**(i) Debenture Redemption Reserve:** Not required in respect of privately placed debentures in terms of Rule 18(7)(b)(ii) of Companies (Share Capital and Debenture) Rules, 2014.
**(j) Net Worth/ Total Equity** as on 31 March 2021 is ₹ 66,688.14 Lakhs
**(k) Total Comprehensive income (Profit after tax + Other Comprehensive income, net of tax)** for the half year ended on 31 March 2021 is ₹ 991.30 Lakhs and for the full year ended on 31 March 2021 is ₹ 1,696.96 Lakhs.
**(l) Earnings per share** as on 31 March 2021: Basic and Diluted ₹ 0.30

* Net worth/Total Equity = Equity Share Capital + Other Equity – Deferred Tax Assets – Intangible assets
* Debt = Debt Securities + Borrowings
* Equity = Equity Share Capital + Other Equity – Deferred Tax Assets – Intangible assets
* Total Comprehensive Income = Profit after tax + Other comprehensive income, net of tax

Yours faithfully,
For **Arka Fincap Limited** *(formerly known as Kirloskar Capital Limited)*
**Sd/-**
**Amit Bondre**
Deputy Company Secretary
*(Membership No. A 26105)*
Date: 28 April 2021